# ध्यास

दिनरात मी तुलाच स्मरतो
स्वप्नातही मी तुला पाहतो
तुजविण जीवन उदास
सजणी पुरव मनीची आस...

कुणास माहीत दैव उद्याचे
कुणा न कळले भाग्य कुणाचे
अंतरी तुझा लागला ध्यास
सजणी पुरव मनीची आस...

हृदयात उमटल्या अनंत आशा
तुझी न कळते फसवी भाषा
प्राणांस लागली प्यास
सजणी पुरव मनीची आस...

कशा आवरू चित्त भावना
तुला न कळती विरहयातना
आता संपव हा वनवास
सजणी पुरव मनीची आस...

– पद्‌माकर चित्रे
('बोल अंतरीचे'
या कवितासंग्रहातून)